
# गुप्त साम्राज्य ( इ. स. 320 ते 550 )

## गुप्त साम्राज्य:

- उत्तर भारतात कुशाण साम्राज्याच्या लयानंतर गुप्त साम्राज्याचा उदय.
- गुप्त हे वैश्य असावेत असे मानले जाते. ( विष्णु पुराणा नुसार )
- संस्थापक श्रीगुप्त याने तिसऱ्या शतकाच्या अखेरीस मगध वर ताबा मिळवला.( इ. स. 275 च्या सुमारास )
- गुप्त हे कुशानांचे सरंजामशाहा असावेत .
  श्रीगुप्त नंतर त्याचा मुलगा घटोत्कच सत्तेवर आला. त्याने स्वत: ला महाराज ही पदवी लावली होती.
- अलाहाबाद प्रशस्ती हरिसेनाने रचली असून त्यात समुद्रगुप्तचे वर्णन आहे.
- दिल्लीजवळ मेहरोली येथील लोहस्तंभावर चंद्रगुप्त दूसरा याच्या पराक्रमाचे वर्णन .
- उदयगिरी येथील शैव लेणीत चंद्रगुप्त दूसरा याचे वर्णन.




## प्रमुख गुप्त राजे:

### 1) चंद्रगुप्त पहिला : ( इ. स. 320 ते 335 )

- सर्वप्रथम महाराजाधिराज ही पदवी घेतली. इ. स. 319.20 मध्ये गुप्त संवत सुरू केले. त्यास गुप्त संवत प्रवर्तक मानले जाते.
- याने लिच्छवी राजकन्या कुमार देवी हिच्याशी विवाह केला. कारण गुप्त हे वैश्य होते तर लिच्छवी हे क्षत्रिय.
- सर्वप्रथम गुप्ताची नाणी पाडली.
- पश्चिमेस प्रयाग पासून पूर्वेस मगध पर्यन्त विस्तार.

### 2) समुद्रगुप्त: ( इ. स. 335 ते 375 )

- चंद्रगुप्त पहिला याचा मुलगा.
- उत्तरेत हिमालयापासून दक्षिणेस नर्मदा पर्यन्त तर पूर्वेकडे ब्रह्मपुट्रा पासून पश्चिमेला यमुने पर्यन्त विस्तार. तमिळनाडूमधील कांचीपर्यंतचा पूर्व किनारपट्टीचा प्रदेशही त्याने जिकला होता.
- विंसेंट स्मिथ याने समुद्र गुप्त याला भारताचा नेपोलियन म्हणले आहे.
- दक्षिणेकडील मोहिमेत वीरसेन हा त्याचा सेनापति होता.
- हरिसेन हा त्याच्या दरबारी असलेला कवि होता.
- अलाहाबाद च्या शिलालेखात त्याचा उल्लेख शंभर युद्धाचा नेता असा केला आहे. त्या लेखास अलाहाबाद प्रशस्ती किंवा प्रयाग प्रशस्ती असेही म्हणतात. या वर्णनानुसार त्याने दक्षिण भारतातील बारा राज्ये जिंकली. हा लेख हरिसेन याने लिहिला होता. नागा सहित आठ आर्यवर्ता तील राजांचा पराभव केल्याचा उल्लेख आढळतो.
- त्याने अश्वमेघ यज्ञ केला तसेच त्याचे सोन्याचे नाणे पण काढले.

- त्याने मेघवर्मण या श्रीलंकन बुद्ध राजाला बोध गया या ठिकाणी विहार बांधण्यास परवानगी दिली म्हणून त्यास अनुकंपवण असे म्हणले आहे.
- त्या काळातील नाण्यावर समुद्रगुप्ताची वीणा हातात घेतलेली प्रतिमा आहे. यावरून तो कलेचा भोक्ता होता. स्वत: कवी म्हणून त्याने स्वत: ला कवीराज ही पदवी घेतली होती.
- त्याच्या दरबारात कवि हरिसेन , बौद्ध पंडित वसुबंधू , व असंग यासारखे विद्वान होते.

2)चंद्रगुप्त दूसरा : **( इ. स. 380 ते414)**

- समुद्रगुप्ता नंतर त्याचा मुलगा रामगुप्त हा सत्तेवर आला असावा. तिच्या कारकिर्दीत झालेल्या क्षकांच्या आक्रमणाला तो तोंड देऊ शकला नाही. त्यामुळे त्याची कारकीर्द अल्पायुषी ठरली. ( देवीचंद्रगुप्त नाटकावरून )
- इ. स. 380 मध्ये चंद्रगुप्त दूसरा( रानी दत्तदेवी हिचा मुलगा ) सत्तेवर आला. ( मथुरा शिलालेख )
- शकांचा बंदोबस्त हे पहिले आव्हान. ( रुद्रसिंह शक )
- त्याने वाकाटक राजा रुद्रसेन दूसरा याच्यासोबत प्रभावती या स्वत: च्या मुलीचा विवाह लावून दिला. त्याच वाकाटकानी शकांसोबत लढताना त्याला मदत केली.
- त्याने कुबेरनागा या नागा राजकन्येशी विवाह केला. पश्चिम क्षत्रपांना पराभूत करून सीमा अरबी समुद्राला भिडवल्या. त्याने माळवा प्रदेशातील उज्जैन येथे दुसरी राजधानी वसवली.
- बंगाल विजयानंतर स्वत: ला विक्रमादित्य व विक्रमांक ह्या पदव्या लावून घेतल्या.
- ह्याच्याच काळात चीनी प्रवासी फाहियान याने भारताला भेट दिली.
- त्याने वैदीक धर्माच्या पुरस्कार केलेला दिसून येतो.
- त्याने सोन्याची, तांब्याची व चांदीची नाणी चलनात आणली. त्याच्यावर गरुडाची प्रतिमा,सिंहासनाधीष्टीत देवी, सिंहा ला मारणारा सिंह – विक्रम , शंख वाजविणारा चंद्रगुप्त, घोड्यावर बसलेला चंद्रगुप्त अशा प्रतिमा आढळून येतात.
- त्याच्या इतर नावांमध्ये (नाण्यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे) विक्रम, देवगुप्त, देवराज, सिंहाविक्रम, विक्रमादित्य शकारी इत्यादींचा समावेश आहे.
- त्यांच्या दरबारात नऊ दागिने किंवा नवरत्न होते, नऊ लोक कला, साहित्य आणि विज्ञान या क्षेत्रातील प्रख्यात. यामध्ये संस्कृतचे महान कवी कालिदास, हरिसेना, अमरसिम्हा, (शब्दकोष) आणि धन्वंतरि, (चिकित्सक) घाटकर्पर, क्षपणक, शंकू ,वराहमिहिर, वररूची, वेताळभट्ट- यांचा समावेश होता. ( कालिदासाच्या ज्योतिर्विदभरण मध्ये उल्लेख )

फाहीयान
गुप्त सम्राट चंद्रगुप्त II च्या कारकिर्दीत भारत भेट दिलेल्या यात्रेकरूंपैकी एक चीनी बौद्ध फाहीयान होता. त्यांनी चीनमधून आपला प्रवास इ.स. 399 मध्ये सुरू केला आणि 405 मध्ये भारत गाठला. इ.स.411 पर्यंत त्यांनी भारतात मुक्काम केल्यावर ते मथुरा, कन्नौज, कपिलवस्तु, कुशीनगर, वैशाली, पाटलिपुत्र, काशी आणि राजगृह यात्रेवर गेले



## कुमारगुप्त ( इ. स. 414 ते455)

- चंद्रगुप्त दूसरा नंतर महादेवी ध्रुवस्वामिनीचा दुसरा मुलगा कुमारगुप्त पहिला सत्तेवर आला.
- त्याने महेंद्रादित्य ही पदवी घेतली. तसेच परमभट्टारक आणि परमद्वैत ह्या पदव्या घेतल्या .

- त्याने कार्तिकेय या युद्धदेवतेची उपासना केली आणि त्याच्या सोन्याच्या नाण्यांवरून असे लक्षात येते की त्याने अश्वमेध समारंभ पार पाडला जो प्राचीन राजांनी त्यांचा सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठी वापरला होता.
- भितारी स्तंभाच्या शिलालेखात स्कंदगुप्त याने त्याच्या कारकीर्दीचे वर्णन केले आहे.
- ते नालंदा विद्यापीठाचे संस्थापक होते आणि 15 जुलै 2016 रोजी युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आले होते.
- त्याच्या कारकिर्दीच्या शेवटी मध्य आशियातील हुणांच्या टोळ्यांनी आक्रमण केले.

**स्कंदगुप्त ( इ. स. 455 ते467)**

- कुमारगुप्त च्या काळात सुरू झालेल्या पुष्यमित्र जमातीच्या व हुणांच्या टोळ्यांच्या आक्रमणाला स्कंदगुप्त याने लगाम घातला.
- सुदर्शन तलावाची दुरूस्ती याचे राज्यपाल पर्णदत्त व पर्णदत्ताचा मुलगा चक्रपाली याने केली.
- विक्रमादित्य व क्रमादित्य ह्या पदव्या घेतल्या. त्याची माहिती भितारी येथील स्तंभावरून समजते.
- त्याच्या नंतर त्याचा भाऊ पुरुगुप्त सत्तेवर आला.

त्यानंतरचे राजे गुप्त साम्राज्य टिकवून ठेवण्यास असमर्थ बनले. विष्णु गुप्त हा शेवटचा राजा समजला जातो.

**गुप्तकालीन प्रशासनव्यवस्था**

- राजपद वंश परंपरागत . राजाला विष्णु देवप्रमाणे मानले जाई.
- खडे सैन्य होते. घोडदळाला विशेष महत्व .
- कुमार अमात्य हा महत्वाचा अधिकारी. मंत्री, सेनापती , महदंडणायक ( न्यायमंत्री ) , संधीविग्राहिक ( युद्ध व तह मंत्री ), हे इतर अधिकारी. धर्मशास्त्राप्रमाणे न्यायनिवाडा होत असे.
- या काळात प्रांतिक व स्थानिक प्रशासन व्यवस्था अस्तित्वात.
- संपूर्ण साम्राज्य भुक्ती ( प्रांत ) यात विभागले गेले होते. उपरिका हा अधिकारी. त्यालाच गोप, भौगिक, व भोगपती अशी नावे.
- भुक्ती ची विभागनी विषय यामध्ये. ( जिल्हा ) त्यावर विषयपती हा अधिकारी. याची नेमणूक उपरिका कडून.
- विषय याचे विभाजन विथी मध्ये तर विथी यांची विभागणी खेडे यांच्यात केलेली होती.
- ग्रामप्रमुखाला अधिक महत्व ; त्याच्या परवाणगीनेच जमिनी ची खरेदी विक्री होत असे.
- शिल्पकार व कर्ज देणारे यांच्या श्रेणी होत्या.

**गुप्तकालीन समाजव्यवस्था**

- ब्राह्मणांना मोठ्या प्रमाणात दान दिले जात असे. नारद याने लिहीलेल्या नारदस्मृती या कायदेविषयक पुस्तकात ब्राह्मणाच्या विशेषाधिकाराची यादी .
- या कालखंडात शुद्रांची स्थिति उंचावली होती.शूद्र लोक कृष्ण या देवाची पुजा करू लागले.
- या काळात जातींची संख्या वाढली होती. पुराणांनुसार 100 तर मनुस्मृती नुसार ती 60 होती.
- या काळात अस्पृश्यांची संख्या वाढली. चांडाळ हा अस्पृश्य समाजाला जात असे. व गावाबाहेर राहत असे.
- उच्चवर्णीया मध्ये बहुपत्नीकत्व प्रथा सुरू झाली होती. या काळात कायस्थ ही नवीन जात निर्माण झाली. हे कारकुनाचा व्यवसाय करू लागले. हा सुरूवातीला दरबारातील विषय परिषदेचा सदस्य होता.

**धार्मिक व्यवस्था**

- बौद्ध धर्म : राजाश्रय मिळाला नव्हता. स्तूप व विहार बांधले गेल्याचे उल्लेख.
  मगध हे बौद्धांच्या शिक्षणाचे केंद्र बनले. महायन पंथातून तांत्रिक पगडा असलेला वज्रयान पंथ निर्माण झाला.
  नागार्जुन, असंग, अर्धदेव, वसुबंधू, व दिग्नाग हे महायन पंथाचे विचारवंत होते.
- जैन धर्म : इ. स.313 साली मथुरा व वल्लभी येथे एकाच वेळी जैन परिषदा. यात जैन धर्माचे प्रमान ग्रंथ ठरवण्यात आले.
  इ.स. 453 मध्ये दुसरी धर्मपरिषद वल्लभी येथे. यात जैन धर्मग्रंथाची संहिता तयार करण्यात आली.
  मथुरा व वल्लभी हे श्वेतांबर तर पांडुवर्धन हे दिगंबर पंथाचे केंद्र.

- **भागवत धर्म** : उत्पत्ती : मौर्योत्तर काळात . विष्णु या धर्माची मुख्य देवता. नारायण व विष्णु देवता विलीन होऊन नारायण विष्णु नावाने ओळखली जाऊ लागली. नारायण या देवाला भगवत म्हणत व त्याच्या भक्तांना भगवत म्हणत.
  भक्ति आणि अहिंसा ही दोन महत्वाची वैशिष्ट्ये . भक्ती ही संकल्पना पुढे वैष्णव व शैव धर्माचा भाग बनली.
  ईश्वर अवताराची संकलपणा भगवतगीतेत मांडली आहे. वायुपुराणात विष्णूच्या अवतारांची यादी दिली आहे.
- शैव धर्म / संप्रदाय : शिव हा प्रमुख देव. सर्व जाती जमातीत पूजला जाणारा देव .

गुप्त काळात पूर्वीपासून चालत आलेली दार्शनिक चर्चा सहा शास्त्रा भोवती स्थिर राहिली.

**तत्वज्ञान अथवा दार्शनिक चर्चा ची सहा शास्त्रे**

1) सांख्य : सर्वात प्राचीन तत्वज्ञान ; कपिल हा उद्गाता. यानुसार जगाची उत्पत्ती व उत्क्रांती याचे जनकत्व निसर्गाकडे. तर्कशुद्ध व वैज्ञानिक दृष्टीकोण . प्रकृती व पुरुष ही ही दोन तत्वे. ईश्वरचंद्र यांचा सांख्यकारिका हा सर्वात प्राचीन ग्रंथ ( चौथ्या शतकातला )

2) योगा : योगाद्वारे मोक्ष प्राप्ती करता येते. शरीर नियंत्रणाचे शास्त्र. पतंजलीने लिहिलेली योग सूत्रे यावर हे शास्त्र आधारित.

3) न्याय : तर्क व ज्ञान प्रक्रियेची सुसंबद्ध पद्धत. अक्षपद गौतम याच्या सूत्रावर हे शास्त्र आधारित. ( पहिले व दुसरे शतक ) आत्मा व परमात्मा सिद्ध करून दाखवण्याचा प्रयत्न .

4) वैशेशिक: भौतिक घटकाच्या चर्चेला महत्व . उलूक कनाद ह्या शास्त्राचा जनक . त्याने अनुवाद मांडला. प्रशस्तपाद हा या शास्त्राचा महान भाष्यकार.

5) मीमांसा : याचा अर्थ तर्क लावणे व अर्थ लावणे असा होतो. या शस्त्राने वैदिक कर्मकांडांना महत्व दिले. स्वर्गप्राप्ती व मोक्ष प्राप्ती या तत्वज्ञानाचे मुख्य ध्येय . यास जैमिनीचे पूर्व मीमांसा दर्शन असेही म्हणतात. शंबर स्वामी हा त्यांचा सर्वश्रेष्ट प्रनेता होता.

6) वेदान्त : वेदांचा शेवट. यालाच उत्तर मीमांणसास असेही म्हणतात. याचा उगम वेदांमध्ये . अब्राहमणी मतांचे जोरदार खंडन . याची मूल सूत्रे बादरायण याने पहिल्या व दुसऱ्या शतकाच्या दरम्यान रचली. त्याचाच ब्रह्मसूत्रे हा ग्रंथ. आठव्या शतकात शंकराचार्य याने समर्थन केले.

## आर्थिक जीवन :

- दिनार ( सोन्याचे नाणे ) या नाण्याचा उल्लेख आढळतो. नोकरवर्गाचे वेतन व जमीन खरेदी व्यवहारासाठी केला जाई.
- स्थानिक देवान घेवाणी साठी चांदीची नाणी.
- रोमन शी व्यापार . रेशीम निर्यात . विष्टी म्हणजे सक्तीचे काम हा प्रकार.
- प्राचीन भारतात गुप्त यांनी सोन्याची नाणी सर्वात जास्त प्रमाणात चलनात आणली

## कला व साहित्य :

- अजिंठा येथील चित्रकला ही गुप्त काळातील कलेचा उत्कृष्ट नमूना तेथील 1,2,16,17 या क्रमांकाच्या गुंफा या काळातील . तसेच बाघ येथील 4 क्रमांकाची व बादमीची 3 क्रम्ङ्कची गुंफा या काळातील .
- धार्मिक आचारांचा वास्तूकला व शिल्पकला याच्याशी निकटचा संबंध.
- या काळात मोकळ्या जागेत मदिरे बांधण्यात येऊ लागली. सांची येथील चैत्याच्या डावीकडील मंदिर ( 17 क्रमांक) या काळातील . विष्णु देवतेच्या मूर्ति जास्त प्रमाणात. सारनाथ व मथुरा येथे या काळातील बुद्ध मूर्ती सापडल्या .
- नालंदा या विद्यापीठाची निर्मिती या काळातील. सर्वप्रथम तेथे विटाचा वापर या काळात झाले.